<u>नियमित दिवाणी मुकदमा नं. ४५/२०१७</u>
<u>*( श्री. रमेश तुकाराम धुरी व.५ विरुध्द श्री. गुणाजी सहदेव धुरी व.१६ )*</u>

## —: नि.४५ खालील आदेश :—

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ प्रमाणे तुर्तातूर्त मनाई ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

<u>अर्जातील वादीची कथने थोडक्यात पुढीलप्रमाणे</u> :—

२. मौजे वाडीवरवडे, ता. कुडाळ जिल्हा. सिंधुदुर्ग येथिल श्री देवी भद्रकाली—भराडी तसेच अन्य देवता मिळून श्री देवी भद्रकाली—भराडी पंचायतन असून सदरचे मंदीराची देवस्थानची सर्व देवकार्ये करण्याचा तसेच उत्पन्न भोगण्याचा वादीच्या घराण्याचा वैयक्तीक हक्क आहे. तसेच फाल्गुन शुध्द होळी पौर्णिमेपासून पाचव्या दिवसापर्यंत सर्व देवकार्ये करण्याचासुध्दा वादी घराण्याचा वैयक्तीक हक्क आहे. वादी क्र. १ ते ३ यांचे वडीलांनी सदर देवस्थानची देवकार्ये करण्याचा त्यांना वैयक्तीक हक्क आहे अशी हक्कप्रस्थापना होवून त्यामधील प्रतिवादींना कायमची ताकीद होण्याकरीता रे.दि.मु.नं. ५९/१९६० दाखल केला होता व तो दावा मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच त्या दाव्याच्या न्यायनिर्णयावर दाखल केलेले रे. दि. अपील नं. २/१९९३ मध्ये सदरचा न्यायनिर्णय कायम करण्यात आलेला आहे. सदर अपीलाच्या निकालात प्रतिवादी क्र. १ ते १६ यांनी वादी यांना कोणत्याही प्रकारे हरकत करू नये अशी ताकीद या अगोदरच दिली असल्या कारणाने त्यांना देवस्थानमध्ये सामील होता येणार नाही. तरीही प्रतिवादी सदर देवस्थानच्या वादी उपभोगीत असलेल्या मानपानास तसेच देवकार्यास हरकत अडथळा करण्याचा प्रयत्न करत आहेत.

३. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, दिनांक २४/०२/२०२० रोजी वादी हे श्री देवी भद्रकाली—भराडी मंदिरात मिटींग घेवून पंचायतनाच्या होळीच्या कार्यक्रमाचे आयोजन करत असताना प्रतिवादी तेथे आले व त्यांनी ‘‘तुम्हाला होळीचा कार्यक्रम करू देणार नाही, तसे केलात तर पुढील परिणाम वाईट होतील,

आम्ही तुम्हाला जिवंत ठेवणार नाही'' अशी धमकी दिली. सदरचा होळीचा उत्सव हा प्रमुख उत्सव असून सदर पंचायतनातर्फे गांव होळी घातली जाते व त्या ठिकाणी वादी घराण्याचा प्रमुख मान असतो. सदरचा पंचायतन होळी कार्यक्रम हा दिनांक ०९/०३/२०२० रोजी रात्री १२.०० वाजता सुरू होवून दिनांक १४/०३/२०२० रोजी रात्री १२.०० पर्यंत चालणार आहे. प्रतिवादी हे सदर देवस्थानच्या कार्यक्रमात अडथळा निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत. होळीचा कार्यक्रम न झाल्यास लोकांच्या भावनांचा उद्रेक होणार असून धार्मिक हक्कावर गदा येणारी आहे. तरी प्रतिवादी नं. १ ते १६ यांना देवस्थानच्या कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होण्याचा हक्क व अधिकार नाही. त्यामुळे त्यांनी दिनांक ०९/०३/२०२० ते दिनांक १४/०३/२०२० या कालखंडात होणारे होळीचे देवकार्य करणेस, मतमान (मानपान), उत्पन्न वगैरे उपभोगण्यास वादींना हरकत अडथळा करू नये अशी त्यांच्याविरूध्द तुर्तातुर्त ताकीद होणेकरीता वादींनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे पुढे असे कथन आहे की, सकृत दर्शनी केस त्याच्या लाभात आहे. तुर्तातुर्त मनाई नाकारल्यास त्याचे अपरिमित असे नुकसान होणार आहे आणि सोयीचा समतोल देखील त्याच्या बाजुनेच झुकत आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र. १ ते ३, ५ ते १० व १२ यांनी नि. ४६ कडे प्रस्तुत अर्जास लेखी म्हणणे दाखल करून वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज नाकारला आहे. वादी अर्जात ज्या रे.दि.मु.नं. ५९/१९६० या दाव्याचा उल्लेख करीत आहेत त्या दाव्यामध्ये प्रतिवादी हे पक्षकार नव्हते. तो दावा कुळकर विरूध्द कुळकर यांचेमध्ये होता. प्रतिवादी हे कुळकर घराण्यातील नसुन थळकर घराण्यातील आहेत व प्रतिवादींचा मान वेगळा आहे. प्रतिवादी यांनी वादींविरूध्द याच न्यायालयात रे.दि.मु. नं. ९६/२०१८ दाखल केला असून त्यामध्ये वादी हजर झाले आहेत, परंतु अद्याप कैफियत दाखल केलेली नाही. होळी सणामध्ये कुळकर व थळकर घराण्याचे मानपान वेगवेगळे आहेत. रे.दि.मु.५९/१९६० व रे.दि.अपील.नं. ०२/१९६३ कडे

प्रतिवादींचा कोणताही संबंध नाही. त्याकामी झालेले न्यायनिर्णय मजकुर प्रतिवादी यांचेवर बंधनकारक नाहीत. वादी वरील दोन्ही प्रकरणामध्ये झालेल्या न्यायनिर्णयांचा आधार घेवून न्यायालयाची दिशाभूल करत आहे.

५. प्रतिवादींचे पुढे असेही कथन आहे की, श्री देवी भद्रकाली—भराडी देवीची मुर्ती भंग झालेबाबत डिसेंबर २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे. हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे एखादी मुर्ती भंग पावली असल्यास नविन मुर्तीची प्रतिष्ठापना होईपर्यंत त्याची पुजा अर्चा केली जात नाही. गांवातील पुरोहितांनी देखील दुस—या मुर्तीची प्रतिष्ठापना केल्याशिवाय पुजा, अर्चा किंवा कोणतेही कार्यक्रम करणे उचित होणार नाही असे सांगितले आहे. तेव्हापासून आजतागायत कोणतेही देवस्थानचे कार्यक्रम केले जात नाही. याच कारणामुळे मागील वर्षी देखील होळीचा कार्यक्रम होवू शकलेला नाही. मुर्ती भंग झालेबाबत देवस्थानच्या स्थानिक सल्लागार उपसमितीने सर्व ग्रामस्थांना मंदीरातील गाभाऱ्याच्या बाहेर बोर्ड लावून जाहीररित्या कळविले आहे. होळीचा कार्यक्रम देखील होवू शकणार नाही. त्यासाठी वादीला हरकत करण्याचा प्रश्न येत नाही. तथापी वादीने महत्वपूर्ण सत्य न्यायालयापासून लपवून ठेवलेले आहे. ते कोर्टासमोर स्वच्छ हाताने आलेले नाहीत. तुर्तातुर्त ताकीद मिळण्यासाठी वादीस प्रथमदर्शनी केस नाही. सोयीचे संपूर्ण तोल वादीचे बाजुने नाही. अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही उलट प्रतिवादींवर न केलेल्या कृत्याबाबत ताकीद दिल्यास त्यांचे पैशाच्या स्वरूपात कधीही भरून न येणारे अपरिमित नुकसान होणार आहे. करीता वादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी प्रतिवादी नं. १ ते ३, ५ ते १० व १२ यांनी विनंती केली आहे.

६. दोन्ही बाजुंच्या परस्पर विरोधी कथनांवरुन माझेसमोर खालील वादप्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.नं. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| २ | सोयीचे समतोलत्व वादीच्या बाजुने झुकते काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ३ | अर्ज नांमजुर केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणारे आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## —: का र ण मि मां सा :—

७. वादीतर्फे सन्माननिय विधिज्ञ श्री. ऐ.के.निरवडेकर यांचा युक्तीवाद ऐकला, तर प्रतिवादी नं १ ते ३, ५ ते १० व १२ तर्फे सन्माननिय विधिज्ञ श्री. डी. व्ही. नार्वेकर यांचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे विधिज्ञ श्री. निरवडेकर यांनी रे.दि.मु. नं. ५९/१९६० चे कामी वादीच्या वडीलाचे वादविषयक देवस्थानमध्ये असलेले मतमान आणि मानपान अंतिमतः शाबीत झाले आहेत. सदर न्यायनिर्णयाविरूध्द मा. जिल्हा न्यायालयात केलेले रे. दिवाणी अपील नं. २/१९६३ नामंजुर करण्यात आलेले आहे. मा. जिल्हा न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाच्याविरूध्द तत्कालीन प्रतिवादी अथवा प्रस्तुत प्रतिवादी यांनी कोठेही अपील दाखल केलेले नाही. सबब रे.दि.मु.नं. ५९/१९६० कामी झालेला न्यायानिर्णय हा अंतिम न्यायनिर्णय आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये वादीच्या वडीलांना वादविषयक देवस्थानमध्ये मतमान व मानपान आहेत हे अंतिमतः ठरविण्यात आलेले आहेत. वादीच्या वडीलांच्या मृत्युप्रश्चात वादी सदरचे मतमान आणि मानपान उपभोगत आहेत. सबब त्या न्यायनिर्णयाच्याविरूध्द जावून प्रस्तुत प्रतिवादी यांना वादविषयक देवस्थानमध्ये वादींना पूर्वापार चालत आलेल्या मतमान व मानपानामध्ये हस्तक्षेप अगर अडथळा करता येणार नाही. प्रतिवादींची कृती ही या न्यायालयातील रे.दि.मु.नं. ५९/१९६० या कामी दिलेला न्यायनिर्णय आणि रे.दि.अपील नं. २/१९६३ च्या कामी दिलेला न्यायनिर्णय यांची पायमल्ली करून न्यायालयाचा अवमान करणारी आहे.

सन्माननीय विधिज्ञ श्री. निरवडेकर यांनी पुढे असा युक्तीवाद केला आहे की, याचकामी वादींनी सन २०१८ सालच्या होळीच्या सणामध्ये प्रतिवादी यांनी वादींना होळीच्या सणामध्ये असलेले मतमान व मानपान उपभोगण्यास हरकत अडथळा करू नये अशा स्वरूपाची तुर्तातुर्त मनाई मागण्यासाठी नि. २४ कडे अर्ज दाखल केला होता. तो मंजुर करून प्रतिवादींनी सन २०१८ सालच्या होळीसणामध्ये वादींच्या मतमानास हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातुर्त मनाई दिलेली होती. वादीचा प्रस्तुतचा अर्ज हा नि. २४ कडील अर्जाशी मिळता जुळता आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर करून प्रतिवादींच्याविरूध्द येत्या होळी सणामध्ये वादींच्या मतमान व मानपान उपभोगण्याच्या अधिकारास हरकत अडथळा करू नये याकरीता तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी अशी विनंती विधिज्ञ श्री. निरवडेकर यांनी केली आहे.

८. याउलट प्रतिवादी नं. १ ते ३, ५ ते १० व १२ तर्फे सन्माननीय विधिज्ञ श्री. नार्वेकर यांनी असा युक्तीवाद केला आहे की, वादी रे.दि.मु.नं. ५९/१९६० आणि रे.दि.अपील नं. २/१९६३ याकामी झालेल्या न्यायनिर्णयांचा गैरअर्थ लावत आहे. श्री देवी भद्रकाली—भराडी देवस्थानचे कुळकर व थळकर असे स्वतंत्र मानकरी आहेत. कुळकर यांचे मान वेगळे आहेत आणि थळकर यांचे मान वेगळे आहेत. रे.दि.मु.नं. ५९/१९६० हा कुळकर घराण्यातील मानपानाबाबत होता. त्याकामी निव्वळ कुळकर घराण्यातील कोणाला मानपान आहेत व तो कोणी, कशा पध्दतीने उपभोगायचा आहे याबाबत न्यायनिर्णय झाला आहे. रे.दि.मु.नं. ५९/१९६० या दाव्यामध्ये थळकर घराण्यातील मानपानाबाबत न्यायनिर्णय दिलेला नाही. सबब रे.दि.मु.नं. ५९/१९६० च्या कामी झालेल्या न्यायनिर्णयाचा वादी गैरअर्थ लावून प्रतिवादी या थळकर घराण्यातील लोकांना वादविषयक देवस्थानमध्ये असलेला मानपान उपभोगण्यापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्नात आहे. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी सन्माननीय विधिज्ञ श्री नार्वेकर यांनी विनंती केली आहे.

९. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.नार्वेकर यांनी असाही युक्तीवाद केला आहे की, वादविषयक देवस्थानमधील देवीची मुर्ती सन २०१८ सालचे डिसेंबर महिन्यात भंग पावल्याचे निदर्शनास आले आहे. हिंदु धर्म शास्त्रानुसार देवस्थानातील देवाची/देवीची मुर्ती भंग पावल्यास नविन मुर्तीची प्रतिष्ठापना केल्याशिवाय त्याची पुर्जा अर्चा करता येत नाही. वादविषयक देवस्थानमधील श्रीदेवी भद्रकाली—भराडी देवीच्या नविन मुर्तीची प्रतिष्ठापना केलेली नाही. अशा परिस्थितीत भंग पावलेल्या देवीच्या मुर्तीची पुजा अर्चा करण्याचा प्रश्न येत नाही. परंतु वादीनी वादविषयक देवस्थानबाबतची महत्वाची तथ्ये न्यायालयापासून लपवून ठेवून तुर्तातुर्त मनाई सारखा समन्यायी आदेश मिळविण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तो नामंजुर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**<u>वादप्रश्न क्र. १ ते ३ बाबत</u>** :—

१०. मुद्दे क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्नीत असलेने त्यांचे विवेचन मी एकत्रात घेतले आहे.

११. तुर्तातूर्त मनाई हुकूम हा एक विवेकाधिकार व समन्वयी दाद आहे. वादीला जर तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळवायचा असेल तर, त्याने तीन तत्वे म्हणजे सकृतदर्शनी केस, सोयीचे समतोलत्व त्याच्या बाजूने आहे तसेच तुर्तातूर्त मनाई न दिल्यास त्याचे पैशाचे स्वरुपात न भरुन येणारे अपरिमीत नुकसान होणार आहे या बाबी शाबीत करणे आवश्यक आहे, त्याचबरोबर तुर्तातुर्त मनाईचा अनुतोष हा समन्यायी असल्याने त्याबाबत अनुतोष मागणी करत असताना न्यायालयापासून कोणतीही बाब लपवून न ठेवता वादीने आपली केस स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे.

१२. वादींनी रे.दि.मु.नं. ५९/१९६० कामी झालेला न्यायनिर्णय आणि त्या न्यायनिर्णयाविरूध्द मा. जिल्हा न्यायालयात झालेले रे.दिवाणी अपील नं.

२/१९६३ च्या कामी झालेला निर्णय यावर आपली संपूर्ण भिस्त ठेवली आहे. वादींच्या वतीने नि. ०६ कडे रे.दि.मु.नं. ५९/१९६० च्या वादपत्राची सहिसुद नक्कल दाखल केली आहे. नि. ०७ कडे रे.दि.मु.नं. ५९/१९६० च्या कामी झालेल्या न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत आणि नि. ०८ कडे रे.दि.अपील नं. २/१९६३ च्या कामी मा. जिल्हा न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे.

१३. प्रतिवादींच्या कथनानुसार वादविषयक देवस्थानमध्ये कुळकर व थळकर असे दोन वेगवेगळे मानकरी आहेत. वादीचा मुळ दावा आणि प्रस्तुतचा अर्ज याचे सुक्ष्मपणे अवलोकन केले असता वादीने प्रतिवादी कोणत्या वखलातील आहेत याबाबतचा उल्लेख केलेला नाही. तथापी प्रतिवादींच्या कथनानुसार वादी कुळकर वखलातील आहेत तर प्रतिवादी थळकर वखलातील आहेत. रे.दि.मु.नं. ५९/१९६० च्या कामी माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी न्यायनिर्णयाच्या परिच्छेद नं. १० मध्ये असे अभिमत नोंदविले आहे की,

> *"It is an admitted position between the parties that, the sects of Kulkars and Thalkars alone officiated at the suit temple since old times. It is further not disputed that, Kulkars and Thalkars separately perform their duties and enjoy the income and Matmans. It is further admitted by both the sides that, the articles of deity required for the various functions and cloths and ornaments wherein possession of Kulkars and Thalkars separately.*

१४. माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी त्या दाव्यातील नि. ८३ कडील दस्तऐवजाबाबत परिच्छेद नं. १० मध्ये पुढे असेही मत नोंदविले आहे की,

*" Exh. 83 is also an old document under the seals of the State. The genuineness of the document is no at all in question. The entry at page no. 3 of this document clearly indicates that, the grand-father of the plaintiff No.1 for the Kulkars and Ganu Laxman Dhuri for the Thalkars were alone held as the officiating priest at the suit temple and they were paid in equal share cash and paddy for the purpose of performing Puja Archa and Nyavaidya. "*

१५. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी रे.दि.मु.नं. ५९/१९६० चे कामी नोंदविलेल्या वरील अभिमतावरून त्या दाव्यातील वादी नं. १ म्हणजे प्रस्तुत दाव्यातील वादींचे वडील तुकाराम कानु धुरी हे कुळकर वखलाचे मानकरी होते तर गणु लक्ष्मण धुरी हा थळकर वखलाचा मानकरी होता.

१६. रे.दि.मु.नं. ५९/१९६० चे कामी कुळकरांच्या तीन वखलांपैकी केवळ प्रस्तुत वादींचे वडील तुकाराम कानु धुरी (त्या दाव्यातील वादी नं.१) आणि कृष्णा महादेव धुरी (त्या दाव्यातील वादी नं.३) यांना वादविषयक देवस्थानमध्ये सणाच्यावेळी सर्वप्रकारचे कार्य करण्याचे व मतमान, मानपान उपभोगण्याचे, देणग्या स्विकारण्याचे हक्क आहेत असे ठरविण्यात आले आहे. रे.दि.मु.नं. ५९/१९६० च्या कामी झालेल्या न्यायनिर्णयाविरूध्द त्या दाव्यातील प्रतिवादींनी तत्कालीन मा. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचेकडे रे. दि. अपील नं. २/१९६३ चे अपील

दाखल केले होते. सदरचे अपील नामंजुर करून रे.दि.मु.नं. ५९/१९६० च्या कामी दिलेला न्यायनिर्णय कायम ठेवण्यात आला आहे. रे दि.अपील नं. २/१९६३ च्या कामी झालेल्या न्यायनिर्णयाविरूध्द पुढे अपील करण्यात आलेले नाही. त्यामुळे रे.दि.मु.नं. ५९/१९६० चे कामी झालेला निर्णय आजही अस्तित्वात आहे.

१७. रे.दि.मु.नं. ५९/१९६० च्या कामी दिलेल्या न्यायनिर्णयाचे सुक्ष्मपणे अवलोकन केले असता तुकाराम कानु धुरी आणि कृष्णा महादेव धुरी यांचे वादविषयक देवस्थानमध्ये असलेले मतमान व मानपान हे केवळ कुळकर घराण्याशी संबंधित आहेत. सदर देवस्थानमधील थळकर घराण्याला असलेले मानपान, हक्क वेगळे आहेत. ते मानमान व हक्क थळकर घराण्यामधील लोकांनी उपभोगण्याबाबत कोणताही न्यायनिर्णय झालेला नाही.

१८. दाव्यातील परि. ४ (ल) मधील वादीच्या अभिकथनानुसार '' फाल्गुन शुध्द होळी पौर्णिमे दिवशी सकाळच्या वेळी देवळाकडे नेमात एक होळी व संध्याकाळी चव्हाटयावर एक होळी अशा दोन होळया घालणे, होळया उभ्या झाल्यावर गणेश पुजन करणे व देवाला नारळ ठेऊन गा—हाणे देणे, चौथ्या दिवशी देवाला प्रथम हळदवणी घालणे, हळदवणीचे काम करून झाल्यावर देवळातून प्रथम घरी येणे, निशाण काठी ढोल यांची पुजा करणे, देवळी महार यांना गांव बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे रक्कमेच्या रूपात त्याना मजुरी देणे, सुताराकडे तळी देणे, नंतर निशाण काठी संपूर्ण गावामध्ये फिरवून रात्रौ चव्हाटयावर येणे, कोलत्या मारणे व सावदाची शिकार करण्याचा कार्यक्रम करणे, पाचव्या दिवशी ब्राहमण देवाकडून कलश भरून मंदिरात आणणे व देवीला प्रथम तिर्थ घालणे, नारळ ठेवून गा—हाणे देणे व मिरवणुकीसह चव्हाटयावर येणे '' असे देवकार्य करण्याबाबतचे वादींना मानपान असल्याचे अभिकथन केले आहे. रे.दि.मु.नं. ५९/१९६० च्या दाव्याचे वादपत्र पहाता त्यामध्ये देखील परिच्छेद नं. ११ मध्ये होळीच्या सणामध्ये

करावयाचे धार्मिक कार्य, विधी व वादींना असलेले मानपान याबाबतचा सविस्तर उल्लेख केला आहे. त्याकामी झालेल्या न्यायनिर्णयानुसार त्या दाव्यातील वादी नं. १ व ३ यांना वादविषयक देवस्थानमध्ये त्या दाव्यामध्ये नमुद केलेले सर्व कार्ये करण्याचे मतमान व मानपान आहेत असे जाहीर केले आहे. प्रतिवादींनी याच न्यायालयात वादविषयक देवस्थानमध्ये त्यांना असलेले मानपान व हक्क ठरवून मिळण्यासाठी रे.दि.मु.नं. ९६/२०१८ हा दावा दाखल केला आहे. वादी, प्रतिवादी यांचे पूर्वज यांचेमध्ये सन १९२० साली एक करारनामा झाला होता व त्या करारनाम्यानुसार कोणी, कोणते काम करावयाचे आहे हे ठरविण्यात आले आहे. त्याप्रमाणे त्यांचे हक्कांबाबत जाहीर ठरावाची मागणी केली आहे. तथापी सदर दाव्यामध्ये अद्याप प्रतिवादींनी आपली कैफियत दाखल केलेली नाही. सदरचा दावा हा न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांनी त्यांच्या थळकर घराण्याचे वादविषयक देवस्थानमध्ये असलेले मानपान व हक्क अधिकार याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही. सबब वादविषयक देवस्थानमध्ये कुळकर घराण्यास असलेले मतमान व मानपान उपभोगण्याचे सर्वस्वी अधिकार हे वादीनाच आहेत. परंतु त्याचवेळी वादविषयक देवस्थानमध्ये थळकर घराण्यास असलेले मानपान, अधिकार नाकारता येणार नाहीत. प्रतिवादीच्या वकीलांनी वादविषयक देवस्थानमधील देवीची मुर्ती भंग पावली आहे त्यामुळे त्याची पूजा—अर्चा केली जात नाही असा युक्तीवाद मांडला आहे. तथापी देवीची नविन मुर्ती बसविण्याबाबत दोन्ही पक्षांनी काहीही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. सबब मुर्ती भंग झाली आहे यावरून सालाबादप्रमाणे होळीचा सण साजरा करण्याची प्रथा खंडीत झाली आहे असे म्हणता येत नाही. सबब होळीच्या सणामध्ये कुळकर घराण्यास असलेले मानपान व मतमान उपभोगण्याचे अधिकार वादीनाच आहेत असे प्रथमदर्शनी दिसते. परंतु, त्यावरून थळकर घराण्याचे असणारे मानपान नाकारता येणार नाहीत. सबब वादींना कुळकर घराण्यास असलेल्या मतमान व मानपानाबाबत अंशत: प्रथमदर्शनी केस आहे या निष्कर्षापर्यत मी पोहोचलो आहे.

१९. वादींचे वडील तुकाराम कानु धुरी आणि कृष्णा महादेव धुरी यांना श्रीदेवी भद्रकाली—भराडी देवस्थानातील कुळकर घराण्याचे मानकरी म्हणून जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे कुळकर घराण्यातील मानपान वादीच्या वडीलांचे पश्चात वादींच्याकडे चालत आलेले आहेत. सबब कुळकर घराण्याचे मानपान उपभोगण्याचे हक्क अधिकार माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी पुराव्याअंती ठरविले असल्याने आणि मा. जिल्हा न्यायालयाने या न्यायालयाचा न्यायनिर्णय कायम केला असल्याने वादविषयक देवस्थानमध्ये वादींचे कुळकर घराण्याचे असलेले मतमान व मानपान सुरक्षित ठेवणे आवश्यक ठरते. सबब कुळकर घराण्याच्या मतमान व मानपानाबाबत न्यायाचा तराजु वादींच्या बाजुने अंशतः झुकतो. त्याचबरोबर वादींना होळीच्या सणामध्ये वादविषयक देवस्थानात असलेले कुळकर घराण्याचे मानपान उपभोगण्यास प्रतिवादी हे हरकत अडथळा करत असल्यास होळी सणाच्या कारणापुरती तुर्तातुर्त मनाई देवून सुरक्षित राखणे आवश्यक ठरते. वादींना कुळकर घराण्याचे असलेले मानपान सुरक्षित राखण्याबाबत मनाई आदेश न दिल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब मी वादप्रश्न क्र. १ ते ३ चे निष्कर्ष 'अंशतः होकारार्थी'' नोंदविले आहेत.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u> :—**

२०. माझे वरील विवेचनावरून तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करण्यासाठी आवश्यक असणारी तीन तत्वे म्हणजे प्रथमदर्शनी केस, न्यायाचा तराजु व तुर्तातुर्त मनाई आदेश नाकारल्यास होणारे अपरिमित नुकसान ही महत्वाची तत्वे अंशतः शाबीत करण्यास वादी यशस्वी झाले आहेत. वादविषयक देवस्थामनध्ये वादींना असलेले कुळकर घराण्याचे होळीच्या सणामध्ये असलेले मानपान, मतमान, हक्कअधिकार उपभोगणेस प्रतिवादी अगर त्यांचेवतीने अन्य कोणीही हरकत अडथळा करू नये अशी होळीच्या सणाच्या कारणापुरता तुर्तातुर्त मनाई आदेश होणेस वादी पात्र आहे. तथापी थळकर घराण्यास वादविषयक देवस्थानमध्ये असलेल्या मानपान व हक्क अधिकाराबाबत प्रतिवादींचेविरूध्द तुर्तातुर्त मनाई देता

येणार नाही. सबब वादीचा अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र आहे. करीता मी वादप्रश्न क्र. ४ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

१. वादीचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी अगर त्यांचेतर्फे इसमांनी यावर्षीच्या होळी सणामध्ये वादींना कुळकर घराण्याचे असलेले श्रीदेवी भद्रकाली भराडी देवस्थानातील मतमान, मानपान, हक्क अधिकार उपभोगण्यास हरकत अडथळा करू नये अशी त्यांना तुर्तातुर्त ताकीद देण्यात येत आहे.

३. अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसण्याचा आहे.

(खुल्या न्यायालयात जाहीर.)

सही/—

कुडाळ ( सदानंद बा. पाटील )
दिनांक :— ०९/०३/२०२० दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) कुडाळ